**नि.फौ.ख.क्र. ३७/२०१५**
सरकार वि. रूपाली व इतर
निशाणी क्र.६०

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१० यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– विलास नारायण पवार ,
**वय** :– ६७ वर्षे, **धंदा** :– सेवानिवृत्त ,
**राहणार** :– गव्हाण, ता. तासगांव, जि. सांगली.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत

**१.** मी सन २०१४ ते २०१६ या कालावधीमध्ये आटपाडी पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. मी आटपाडी पोलीसठाणेमधील गुन्हा क्र. १३४/२०१४ चा तपास केला होता. दि. २९/९/२०१४ रोजी रामचंद्र गळवे यांनी गळवेवाडी येथे एका अज्ञात इसमाने एक दिवसाचे पुरूष जातीचे अर्भक ज्वारीचे पिकात सोडून दिल्याबाबतची फिर्याद दाखल केली होती. तपासादरम्यान मी गळवेवाडी येथील घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदरचे ठिकाण हे दत्तात्रय वाघमारे यांची जमीन गट नंबर ८७ चे बाजरीचे पिकामध्ये होते. आता मला दि. २९/९/२०१४ रोजीचा पंचनामा दाखविणेत आला त्यावर माझी व पंचाची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६१** देणेत येते. त्याठिकाणी मला बाजरीचे पिकाची छाटणी करून ५ फुट व्यासाची जमीन खुरदळलेली दिसली.

**२.** त्यानंतर मी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आटपाडी पोलीसठाणेतील कर्मचारी आणि डॉक्टर यांचे बयाण नोंदविले. सापडलेले अर्भकास सांगली येथील दवाखान्यात डॉक्टरांनी पाठविलेले होते. तपासादरम्यान बातमी मिळाली की, मिळून आलेले अर्भक हे रूपाली वाघमारे आणि धनाजी सुखदेव गळवे यांचे असलेचे समजले. त्यांचा शोध घेतला असता आरोपी क्रं. १ रूपाली वाघमारे या मिळून आल्या. आरोपी क्रं. १ ला दि. ०१/१०/२०१४ रोजी अटक केली. आरोपी नं. २ धनाजी गळवे हा मिळून आल्याने त्यालाही अटक करणेत आली. आरोपी क्रं. १ व २ यांची वैदयकिय तपासणी करणेत आली आणि डीएनए करणेकरीता सॅम्पल डॉक्टरांनी घेतले. मिळून आलेल्या अर्भकाचे डीएनए करण्याकरीता डॉक्टरांनी त्याचे सॅम्पल घेतले. दोन्ही सॅम्पल हे सी.ए. परीक्षणाकरीता पाठविणेत आले. त्यानंतर साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदविले.

**३.** मिळून आलेल्या अर्भकास माधवनगर येथील भारतीय समाजसेवा या संस्थेमध्ये संगोपणाकरीता ठेवणेत आले. आरोपीविरूध्द पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणेत आले. दोषारोपपत्रासोबत मी स्टेशनडायरीचा उतारा दाखल केला आहे ज्यामध्ये कलमवाढ करणेत आली आहे. आता मला सदर स्टेशनडायरीचा उतारा दाखविणेत आला त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६२** देणेत येते.

**४.** मी दि. ०३/१०/२०१४ रोजी पोलीस अधिक्षक, सांगली यांना सांगली येथील सरकारी दवाखान्यामधून डीएनए कीट मिळणेकरीता पत्र पाठविले होते. आता मला सदर पत्राची

स्थळप्रत दाखविणेत आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६३** देणेत येते. मी तपास करत असताना आटपाडी पोलीसठाणेचे पोलीस निरीक्षक सदाशिव शेलार हे होते. आता मला सी.ए.परीक्षणकरीता पाठविणेत आलेल्या दि. ०७/१०/२०१४ रोजीच्या न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखविणेत आली. त्यावर माझी सही असून त्यावर पोहोच आहे.त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६४** देणेत येते. आता मला सांगली येथील समाजसेवा केंद्रामध्ये अर्भकास जमा केल्याबाबतचे दि. ०३/१०/२०१४ रोजीचे पत्राची स्थळप्रत दाखविणेत आली. त्यावर माझी सही आहे.त्यावर पोहोच आहे. मजकूर बरोबर असून त्यास **निशाणी ६५** देणेत येते. दोषारोपपत्रासोबत मी गळवेवाडी येथील जमीन गट क्र.८७ दत्तात्रय वाघमारे यांच्या जमीनीची ७/१२ प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी ६६** देणेत येते. मी तहसीलदार यांना घटनास्थळाचा नकाशा काढून देण्यासंदर्भात पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविले त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी ६७** देणेत येते. त्यानुसार मंडलअधिकारी यांनी घटनास्थळाचा नकाशा काढून अहवालासह मला पत्र पाठवून नकाशा दिला. आता मला सदरचे पत्र व नकाशा दाखविणेत आला त्यास **निशाणी ६८** देणेत येते. (यावेळी सरकारी वकीलांनी नकाशास निशाणी देणेची विनंती केली. आरोपीच्या वकीलांनी असा आक्षेप घेतला की, मंडलअधिकारी यांची साक्ष नोंदविल्याशिवास त्यास निशाणी देता येणार नाही. मंडलअधिकारी जरी सरकारी कर्मचारी आहेत तरी नकाशा तयार करताना विचारात घेतलेली तथ्थ याबाबतची वैयक्तीक माहीती मंडलअधिकारी यांना असलेमुळे त्यांचे साक्षीशिवाय नकाशास निशाणी देता येणार नाही.) मी आरोपींना पाहील्यास ओळखू शकतो ते आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी.डी.जेडगे यांचेमार्फत सुरु.**

**५.** माझे शिक्षण बारावीपर्यत झाले आहे. दि. २९/९/२०१४ रोजी तपास माझेकडे आला. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हयातील फिर्यादी यांचे जबाब मी नोंदविला नाही. साक्षीदार सांगतात पुरवणी जबाब नोंदविला आहे. साक्षीदार संचिका पाहून सांगतात तसा पुरवणी जबाब दोषारोपपत्रासोबत दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमधील मजकूर खरा आहे किंवा खोटा आहे याची वैयक्तीक पडताळणी मी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्भक मिळून आले व त्यास दवाखान्यात दाखल केले असा दर्शविणारा कागद दोषारोपपत्रामध्ये दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की,अर्भकावर दवाखान्यात उपचार केले असल्यास तसा कागदोपत्री पुरावा दवाखान्यातून मिळतो. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान मी दवाखान्यातून अर्भकावर उपचार घडले होते असता कागदोपत्री पुरावा हस्तगत करून दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही प्रकार घडला नसल्यामुळे मी तसा कागदोपत्री पुरावा दवाखान्यातून घेवून दाखल केला नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, एखादे अर्भक बेवारस सापडल्यास ते संगोपणाकरीता एखादया ठिकाणी ठेवावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, असे बेवारस अर्भक एखादया संस्थेमध्ये संगोपणाकरीता ठेवणेसाठी न्यायालयाच्या किंवा सक्षम अधिका–याचा आदेश लागतो. हे म्हणणे खरे नाही की, असा कोणताही आदेश या प्रकरणामध्ये दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की,

कोणताही सरकारी अधिकारी कामानिमीत्त बाहेर गेल्यास त्याला कार्यालयातील हालचाल रजिष्टरमध्ये नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वैदकिय अधिकारी यांना तोच नियम लागू आहे. हे म्हणणे खरे आहे की, १०८ च्या अॅब्युलन्समध्ये तशाप्रकारचे रजिष्टर ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कोणतेही बेवारस अर्भक सापडलयास त्यास बालरोग तज्ञाकडे दाखविले जाते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये असा कोणताही बालरोगतज्ञाचा अहवाल, प्रमाणपत्र दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत अभ्रक आणि आरोपी यांच्या वयाबाबतचे कोणतेही पुरावे या प्रकरणात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे घटना पाहणारा कोणताही इसम त्या परीसरामध्ये मला तपासामध्ये निष्पण्ण झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटना घडली नसल्यामुळे मला तपासामध्ये तसा स्थानीक साक्षीदार मिळून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतलेप्रमाणे कोणताही प्रकार घडला नाही असे माझ्या तपासात निष्पण्ण झाले होते.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी तालुक्यातील गळवेवाडी हे गाव हेवेदावे, तक्रारी व केसेसकरीता प्रसिध्द आहे. हे म्हणणे खरे नाही, त्याचाच भाग म्हणून कोणीतरी खोटी तक्रार दिली आणि मी चुकीच्या दिशेन तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अर्भक मी स्वतः समक्ष पाहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अभ्रकाच्या ठावठिकाणाची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळाचा पंचनामा केला, तपासटिपण नोंदविले,व डीएनएचे नमुने परीक्षणाकरीता पाठविले आणि आरोपीविरूध्द पुरावा आला या सर्व सरतपासामधील बाबी खोटया सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या विरोधातील लोकांनी खोटी तक्रार दाखल केली आणि मी चुकीचा तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.03.05 10:57:10 +0530

दिनांक –०४.०३.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आटपाडी.